
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ११ | अंक २ | मार्च २०२६ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com


## इराण • अमेरिका • इस्रायल संघर्ष — प्रवासी भारतीय आणि भारतावर काय परिणाम?

"तेलाचे भाव • परकीय चलन • प्रवास बंदी • अर्थव्यवस्था"





Impact of Iran War
on Indian Economy
RISING OIL PRICES
• Crude Oil Surge
• Higher Fuel Costs
Increased Import Bill
INFLATION SPIKE
• Costlier Food & Goods
• Higher Living Expenses
INDUSTRIAL IMPACT
• Job Losses & Layoffs
• Production Slowdown
CURRENCY PRESSURE
• Rupee Depreciation
• Forex Volatility
TRADE DISRUPTION
• Disrupted Supply Chains
• Export Challenges
AGRICULTURE STRAIN
• Rising Input Costs
• Farm Income Stress
ECONOMIC SLOWDOWN
• Slower GDP Growth
• Market Uncertainty

विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | - डॉ. संदीप कडवे |
| २. | भारतातील कच्चे तेल आयात व शुद्धीकरण | - पांथस्थ रिसर्च |
| ३. | अनिवासी भारतीयांना नोकरी व्यवसायाच्या अन्य देशांत संधी | - पांथस्थ रिसर्च |
| ४. | इराणच्या हृदयात एका शीखाचा आत्मा | - परविंदर सिंग चंढोक |
| ५. | अनिवासी भारतीयांचा एकाकीपणा | - दिलीप केशव परांजपे |
| ६. | यु एस - इस्राएल - इराण युद्धाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम | - राजन तावडे |


विश्व पांथस्थ
वर्ष ११ । अंक २
मार्च २०२६

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन तावडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
देविका घोरपडे, इंदौर
डॉ.नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 11 Issue 2
March 2026

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Devika Ghorpade - Indore
Dr. NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)

या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

विश्व पांथस्थ चे जुने अंक www.panthastha.info इथे बघता येतील.

## संपादकीय



# आधुनिक महाभारत

- डॉ. संदीप कडवे

युद्ध म्हणजे दोन किंवा अधिक राष्ट्रप्रमुखांच्या अहंकारी प्रवृत्तीमुळे सुरु झालेला विध्वंस आणि त्यानंतर पुनर्निर्मिती साठी त्याच दोन किंवा अधिक सत्ताधाऱ्यांनी आर्थिक हित डोळ्यासमोर ठेवून केलेला अतिरेकी कारभार, ज्यात सर्वसामान्य नागरिक उध्वस्त होतो.

बटरफ्लाय इफेक्ट काय असतो ते समजून घ्यायचे असेल तर सध्याच्या युद्धाचा अभ्यास करा. कारण आणि परिणाम म्हणजे कौज अँड इफेक्ट हि पद्धत वापरा. एप्सटिन फाईल्स मुळे अमेरिका इस्राएल इराण आखाती देश असे जागतिक युद्ध झाले असा दावा खुद्द अमेरिकेच्या नागरिकांनी केला. त्यात ट्रम्प च्या मुलाने युद्धाआधी ३० मिलियन डॉलर्स चे ऑइल फक्त आर्थिक फायद्यासाठी खरेदी केले असे उजेडात आले. मोदींबाबत व भारताबाबत ट्रम्प ने अनेक वादग्रस्त विधाने केली आहेत. त्याची सत्यता कोण पडताळणार? ट्रम्प ची मानसिक स्थिती ठीक नाही असा दावा मधून मधून अमेरिकेतच केला जातो. असा माणूस अमेरिकेचा प्रेसिडेंट आहे आणि त्याला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आता हा अतिरेकी प्रयोग अंगाशी येतो आहे,, अमेरिकेच्या संसदेनेच ट्रम्प ला युद्धाबाबत पुढील निर्णय घेण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला आहे. आज हा अंक प्रकाशित होई पर्यंत इराणने अमेरिका व इस्राएल च्या तोंडाला फेस आणला आहे. या युद्धात केवळ जीसीसी देशांनाच नाही, तर भारतालाही ओढण्याचा प्रयत्न झाला आहे. इतक्या युद्धखोर नीतींमुळे भारतासारख्या देशाला याचा फार मोठा फटका बसला आहे. यात भारतीय नेतृत्व देखील शंकेच्या सावटाखाली आहेच. या युद्धाचे परिणाम मात्र सामान्य अनिवासी आणि निवासी भारतीयांना भोगावे लागणार आहेत. त्यांचा काही दोष नसतांना. हे युद्ध जर जास्त पसरले तर अणुयुद्धाचा धोका निर्माण होत आहे आणि अणुयुद्धामुळे संपूर्ण जग एका मोठ्या संकटात सापडणार आहे. त्यामुळे पांथस्थ परिवारातर्फे आपण फक्त जागतिक शांततेची प्रार्थना करणार आहोत.

**जीसीसीमधील एनआरआयंवर युद्धाचा खोलवर व व्यापक परिणाम -**

खाडी सहकार्य परिषद (जीसीसी) म्हणजे कुवैत, बहरैन, कतार, सौदी, युएई व ओमान या व आसपासच्या १४ देशांमध्ये अमेरिका, इस्रायल आणि ईरान यांच्यातील तीव्र युद्धाने संपूर्ण आखाती क्षेत्रात भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण पसरले आहे. फेब्रुवारी २०२६ च्या शेवटी सुरू झालेल्या या संघर्षाने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (यूएई), कतार, कुवेत, बहरीन आणि ओमान या देशांवर थेट ईरानी मिसाइल आणि ड्रोन हल्ले झाले आहेत. येथील सुमारे ९० लाख अनिवासी भारतीय (एनआरआय) सध्या जीव मुठ्ठीत धरून जगत आहेत. अडकलेले शेकडो टुरिस्ट भारतीय परत सुखरूप भारतात आणले गेले आहेत. पण आखातात काम करणारे लाखो भारतीय उद्या काय होणार या चिंतेत आहेत. त्यांच्या सुरक्षितता, रोजगार, आर्थिक स्थैर्य, कुटुंबीयांच्या भविष्यावर आणि मानसिक आरोग्यावर हे युद्ध प्रचंड विपरीत परिणाम करत आहे. हा केवळ ब्रेकिंग न्युज किंवा लेखाचा विषय नाही, तर लाखो कुटुंबांच्या आशा-अभिलाषांचा आणि स्वप्नांचा गंभीर प्रश्न आहे. जीसीसीमधील भारतीय हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत आणि हे संकट त्यांच्याबरोबरच संपूर्ण देशाला हादरवते आहे.

**युद्धाची पार्श्वभूमी: कशी पडली ठिणगी आणि जीसीसीची कठीण**

**स्थिती -**

२०२६ ईरान युद्धाची सुरुवात २८ फेब्रुवारी रोजी झाली. अमेरिका आणि इस्रायलने ईरानच्या नतांझ आणि फोर्डो येथील अणु संशोधन केंद्रांवर अचानक हवाई हल्ले चढवले. हे हल्ले ईरानच्या अणु कार्यक्रमाला आळा घालण्यासाठी होते. प्रत्युत्तरात ईरानने 'ऑपरेशन ट्रू प्रॉमिस ३' अंतर्गत जीसीसीतील अमेरिकन लष्करी तळांवर शेकडो बॅलिस्टिक मिसाइल आणि ड्रोन नेले. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अबू धाबीतील शासकीय संकुल, रिआदमधील तेल शुद्धीकरण संयंत्रे, दोहामधील निवासी भाग आणि मनामामधील बंदराला, अमेरिकन युद्ध वसाहतींना व कार्यालयांना धक्के बसले. या हल्ल्यांमुळे जीसीसीचे हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद पडले, नंतर ते चालू झाले. पण होरमुझ सामुद्रधुनीतील तेल टँकर मार्ग बाधित झाले, बंद झाले आहेत, त्यामुळे संपूर्ण जगाला होणार तेल व वायूचा पुरवठा खंडित झाला आहे. त्याचबरोबर आखाती देशांना अन्नाचा व इतर पुरवठा बंद झाला आहे आणि प्रमुख शहरांत कर्फ्यू घोषित करण्यात आला. परिस्थिती अजून भयानक होण्याची शक्यता आहे.

उशिरा का होईना, आता जीसीसी देश तटस्थतेचा धागा पकडून नीती निर्धारित करत आहेत. सौदी अरेबियाने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत ईरानी हल्ल्यांची निंदा केली, यूएईने अमेरिकन तळे तात्पुरते बंद करण्याची धमकी दिली, तर कतारने मध्यस्थीची भूमिका स्वीकारली. मात्र, ईरानचे सततचे हल्ले त्यांची तटस्थता धोक्यात आणत आहेत. जागतिक बाजारात तेल उत्पादन ३० टक्के ने घसरले असून, क्रूड ऑइलची किंमत १२०-१३० डॉलर प्रति बॅरेल गाठली आहे. यामुळे जीसीसीची अर्थव्यवस्था हादरली आहे. बांधकाम क्षेत्र ५० टक्के ने ठप्प, पर्यटन व्यवसाय शून्य झाला आणि व्यापार केंद्रे बंद पडली. ही सर्व क्षेत्रे एनआरआयंसाठी, त्यांच्या नोकरी धंद्यासाठी महत्वाची आहेत.

**एनआरआयंच्या सुरक्षिततेची गंभीर चिंता: भीतीचे वातावरण -**

जीसीसीमध्ये एकूण ९० लाख भारतीय नागरिक आहेत. यांपैकी ६० लाखाहून अधिक मजूर बांधकाम, ड्रायव्हिंग, साफसफाई, घरकाम आणि लॉजिस्टिक्समध्ये कार्यरत आहेत. उरलेले व्यावसायिक, डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि छोटे उद्योजक आहेत. पहिल्याच आठवड्यात २५ हून अधिक भारतीयांचा मृत्यू झाला आहे. दुबईतील एका उंच बांधकाम साइटवर हल्ला झाला, ज्यात १० मजूर जखमी झाले. अनेक ठिकाणी मिसाईल किंवा ड्रोन हल्ला झाला. दुबईने देखील इराणच्या डिसॅलिनेशन प्लांट वर हल्ला केला व ते उध्वस्त केले. रिआदमधील भारतीय वस्तीत जीवितहानी झाली, तर कुवेत सिटीत एका भारतीय ड्रायव्हरचा मृत्यू झाला. लोक रस्त्यावर न निघता घरात, हॉटेलमध्ये किंवा शाळांमध्ये लपले आहेत. कामाच्या ठिकाणी जाणे आता जीवघेणे झाले आहे. कुवैत आणि बहरैन मधील अमेरिकी तळावर हल्ले झाले, तळ उध्वस्त झाले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एनआरआयंचे भावनिक व्हिडिओ आणि फोटो व्हायरल होत आहेत - रात्रीच्या भीतीत घराच्या खिडक्यांमागे लपलेले स्त्री पुरुष, रडत असलेली मुले, बंद पडलेली दुकाने आणि रिकामी रस्ते. यातील काही विडिओ खोटे आहेत. कतारमधील भारतीय शाळा पूर्णपणे बंद झाल्या, परीक्षा स्थगित झाल्या आणि ऑनलाइन वर्ग सुरू आहेत पण इंटरनेट कनेक्टिव्हिटी खंडित आहे. भारत सरकारने ३ मार्च रोजी 'ऑपरेशन समुद्रसेतू २' लाँच केले. भारतीय नौसेना जहाजे INS विक्रमादित्य आणि INS जलाश्व तैनात केले गेले असून, विशेष विमानाने ५० हजारांहून अधिक एनआरआयंना सुरक्षित भारतात आणले आहे. मात्र, हवाई क्षेत्र बंद असल्याने लाखो नागरिक अजूनही प्रतीक्षेत आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने २४ तास हेल्पलाइन (१८००-११-६४०२) सुरू केली असून, प्रत्येका नागरिकाची माहिती घेतली जात आहे.

**आर्थिक संकट: विप्रेषणांचा धक्का आणि नोकऱ्यांचा प्रश्न -**

जीसीसीमधील भारतीय एनआरआय भारताला वर्षाला ११० अब्ज डॉलर विप्रेषण (रेमिटन्स) पाठवतात. हे भारताच्या एकूण जीडीपीचा ३.५ टक्के भाग आहे आणि केरळ, महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेशसारख्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेला आधार आहे. सध्या बांधकाम प्रकल्प ५० टक्के ने थांबले आहेत. सौदी अरेबियाचे 'व्हिजन २०३०' अंतर्गत चालू असलेले मेगा प्रोजेक्ट्स अनिश्चितकाळासाठी स्थगित झाले. यूएईतील दुबई एक्स्पो विस्तार आणि अबू धाबीमधील नवीन विमानतळ प्रकल्प बंद. यामुळे ७ लाखाहून अधिक नोकऱ्या धोक्यात आहेत. सुरुवातीला भीतीमुळे एनआरआयंनी बचत खात्यांमधून पैसे घरी पाठवले, फेब्रुवारी महिन्यात विप्रेषण २० टक्के ने वाढले. मात्र, मार्चमध्ये घसरण सुरू झाली - नोकऱ्या गेल्या की उत्पन्न कसे येईल?

तेलाच्या किंमती वाढल्याने भारतात महागाई दर ८ ते १० टक्के पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, ज्यामुळे अन्नधान्य, वाहतूक

आणि दैनंदिन खर्च वाढेल. दुबईतील भारतीय दुकानदार आणि रेस्टॉरंट्सचा व्यवसाय ७० टक्के ने खाली आला आहे. कतारमधील हॉटेल्स बंद पडली आहेत. भारतातील रिअल इस्टेट बाजारावरही परिणाम पडला - एनआरआय गुंतवणूक थांबली असून, मुंबई, पुणे, कोची येथील लक्झरी प्रॉपर्टीजला मागणी कमी झाली. दीर्घकाळ हे युद्ध चालले तर भारत-जीसीसी द्विपक्षीय व्यापार २५ टक्के ने घसरणार आहे.

**कुटुंबीयांचा मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक ताण -**

एनआरआय बहुतेक एकटे किंवा छोट्या कुटुंबांसह राहतात. युद्धाने कुटुंबे पूर्णपणे वेगळी पडली - पत्नी आणि मुलांना घरी पाठवले जात आहे. केरळ आणि तेलंगाणातील गावांत अचानक परतलेल्या महिलांची संख्या वाढली आहे. शाळा आणि कॉलेजेस बंद, परीक्षा रद्द झाल्या. मुले ऑनलाइन वर्ग घेत आहेत पण इंटरनेट आणि वीज खंडित होत आहे. मुलांमध्ये भीती, चिंता आणि अभ्यासाकडे लक्ष नसणे ही समस्या आहे. पालकांना मुलांचे भविष्य धोक्यात वाटत आहे.

मानसिक आरोग्यावर खोल परिणाम होत आहे - अनिद्रा, तणाव, नैराश्य आणि पॅनिक अटॅक्स वाढले. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) जीसीसीमधील भारतीयांसाठी मोफत टेलिफोन हेल्पलाइन सुरू केली आहे. स्थानिक जीसीसी नागरिक आणि एनआरआयंमध्ये तणाव वाढला आहे. भारतीय सामाजिक संघटना सक्रिय झाल्या आहेत - अन्न वाटप, वैद्यकीय मदत, काउन्सेलिंग आणि कायदेशीर सल्ला देत आहेत. दुबईतील भारतीय व्यवसाय परिसंघाने स्वतःचा बचाव गट तयार केला आहे. इंडियन पीपल फोरम या संस्थेतर्फे एक पॅनल फॉर्म झाले आहे जे अनिवासी भारतीयांना संकटकाळात मदत पुरवते आहे. त्यात नीलम नांदेडकर, प्रचिती तलाठी यांचा समावेश आहे. दुबईतील अनेक व्यक्ती, राहुल तुळपुळे, अभिजित इगावे, जतीन परब, नरेंद्र भागडीकर, सुशांत सावर्डेकर कुवैत मधून बबिता पाटील, मुकुंदराज पाटील, कतार मधून उषा पाटील, भारतातून धनश्री पाटील, बहरैन मधून रुपल शिंपी या त्यांच्या संस्थेमार्फत व वैयक्तिक रित्या प्रचंड मदत करत आहेत.

**भारत सरकारची भूमिकाः तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना -**

भारत सरकारने वेगाने आणि ठाम पावले उचलली आहेत. विदेश मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी जीसीसी नेत्यांशी थेट चर्चा केली. १० लाख रुपयांचे विमा कवच सर्व एनआरआयंसाठी जाहीर केले. भारतीय नौसेना आणि हवाई दलाची मोठी मदत - INS कोचीन आणि एअर इंडिया स्पेशल फ्लाइट्स सक्रिय. भविष्यासाठी 'गल्फ सेफ्टी फंड' ची स्थापना प्रस्तावित आहे, ज्यात आणीबाणी निधी असेल. कौशल्य विकास कार्यक्रम राबवून युरोप, कॅनडा, ऑस्ट्रेलिया किंवा दक्षिणपूर्व आशियातील (सिंगापूर, मलेशिया) पर्यायी नोकऱ्या शोधण्याचा योजना आहे.

कूटनीती हा मुख्य आधार आहे. भारताने ईरान, अमेरिका आणि इस्रायल यांच्याशी संतुलित बोलणी करावीत. शांतता प्रस्थापित झाली तर एनआरआय पुन्हा जीसीसीत परत येतील आणि अर्थव्यवस्था सावरणार आहेत.

**भविष्यातील आव्हानेः संकट आणि आशेचे द्वंद्व -**

हे युद्ध जर तीन महिने चालले तर जीसीसीची अर्थव्यवस्था कोलमडेल. एनआरआयंना नवीन बाजारपेठा शोधाव्या लागतील, जसे अमेरिका, युरोप किंवा जपान. पण त्यांची लवचिकता आणि धैर्य प्रेरणादायी आहे. केरळ, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान, आंध्र प्रदेश, ओरिसा, बंगाल, पंजाब, तामिळनाडू, कर्नाटक, गोवा येथील अनेक शहरे व गावे स्थलांतरितांवर अवलंबून आहेत. केरळच्या मलाप्पुरम, महाराष्ट्राच्या मुंबई, कोल्हापूर, पुणे, नागपूर, नासिक, धुळे, जळगाव, कोकण विभाग, तेलंगणाच्या हैदराबाद येथील अनेक गावे एनआरआय विप्रेषणांवर अवलंबून आहेत. त्यांचे स्वप्न - पक्के घर, मुलांचे चांगले शिक्षण, वृद्ध पालकांची काळजी - सध्या धोक्यात आहे. अणुयुद्ध झाले तर सर्वच संपेल.

तरीही आशा आहे. एनआरआय हे भारताचे अभिमान आहेत. त्यांनी आधीही संकटे पेलली आहेत. पूर्वीचे गल्फ वॉर, कोविड सारख्या परिस्थितीलाही आखाती अनिवासी भारतीयांनी तोंड दिले, पुन्हा उभे राहिले. अनेक सामाजिक संस्था आणि व्यक्ती या कठीण काळात एन आर आय ना मदत करण्यासाठी पुढे आले आहेत. त्याचे प्रयत्न खरंच स्तुत्य आहेत. एकजूट, सरकारची कूटनीती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याने हे संकट संपेल अशी आशा आहे. सर्वच जण शांततेसाठी प्रार्थना करत आहेत. सर्वसामान्य माणसाला युद्ध नको आहे. भारत सरकारने कायमस्वरूपी 'एनआरआय सुरक्षा धोरण' तयार करावे अशी अपेक्षा आहे. पूर्वीच्या सरकारमध्ये एन आर आय मिनिस्ट्री असा स्वतन्त्र विभाग होता. सुषमा स्वराज सारख्या मंत्री अनिवासी भारतीयांसाठी धडाडीने काम करत होत्या. आता मोदी आणि जयशंकर यांच्या कारकिर्दीत

त्यापेक्षा जास्त चांगले काम होईल अशी अपेक्षा बाळगायला काय हरकत आहे. युद्ध उद्या संपेलही. पण या युद्धात सर्वसामान्य नागरिकांचे झालेले आर्थिक व कौटुंबिक नुकसान कधीच भरून येणार नाही. जागतिक नेत्यांनी संपूर्ण जगाला वेठीला धरले आहे, जगाची दिशाभूल केली आहे. एप्सटिन मुळे युद्ध सुरु झाले असे असेल तर त्यापेक्षा अधिक दुर्दैव काही नाही. इस्राइलला त्यांच्या देशासाठी थोडी जमीन हवी होती. ती वादग्रस्त ठरते आहे. एका दृष्टीने हे आधुनिक महाभारत आहे.

कालाय तस्मै नमः

**- डॉ. संदीप कडवे**

९ मार्च, २०२६, पुणे

| **क्षेत्र** | **पूर्वीची स्थिती (२०२५)** | **सध्याचा परिणाम (मार्च २०२६)** | **भविष्यातील धोका (६ महिने)** |
|---|---|---|---|
| बांधकाम मजूर | ४० लाख कार्यरत | ५०% प्रकल्प बंद, ३ लाख बेरोजगार | ७ लाख नोकऱ्या जाणार |
| विप्रेषण (रेमिटन्स) | ११० अब्ज /वर्ष | +२०% (फेब), -१०% (मार्च) | ३०% टक्के घसरण शक्य |
| तेल किंमती आणि महागाई | ८०/बॅरेल, ५% महागाई | १२०/बॅरेल, ८% महागाई | १५०/बॅरेल, १५% महागाई |
| पर्यटन आणि लहान व्यवसाय | दुबई: २० दशलक्ष पर्यटक | हॉटेल्स बंद, -६०% व्यापार | दीर्घकालीन मंदी, दिवाळेगिरी |
| रिअल इस्टेट गुंतवणूक | २० अब्ज वार्षिक | पूर्णपणे थांबले | भारतातील बाजार कोलमडणार |

भारताकडे येणारे विप्रेषण (Remittances) FY25 मध्ये ऐतिहासिक उच्चांक १३५.४६ अब्जांवर पोहोचले, ज्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत १४% वाढ झाली आहे. सहा जीसीसी (GCC) देश - बहरेन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरात (UE) - मिळून भारताच्या एकूण वार्षिक रेमिटन्सस पैकी सुमारे ३८% इतका वाटा उचलतात. जीसीसी देशांमध्ये UE हा सर्वात मोठा योगदानकर्ता असून, भारताकडे पाठवण्यात येणाऱ्या एकूण रकमेपैकी जवळपास १९% इतका वाटा त्याचा आहे. २०२५ च्या सुरुवातीस, भारतीय प्रवासी (Indian diaspora) एकूण ३.५ कोटींपेक्षा अधिक असल्याचा अंदाज आहे, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार खाडी प्रदेशात राहतात.


**FORM IV**

Statement about ownership and other particulars about newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue every year after the last day of February

1. **Place of publication :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411 057.
2. **Periodicity of its publication :** Monthly
3. **Printer's Name :** Sandeep Vasantrao Kadwe Nationality : Indian Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
4. **Publisher's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
   **Nationality :** Indian
   **Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
5. **Editor's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
   **Nationality :** Indian
   **Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
6. **Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital.**
   Sandeep Vasantrao Kadwe
   A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune-411 057.
   I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

   Date : 11th March 2026 Sd/ Signature of Publisher

# भारतातील कच्चे तेल आयात व शुद्धीकरण

युद्धामुळे भारतात येणारे ऑइल आणि गॅस बंद होते. त्याचा थेट फटका भारतीयांना बसतो. भारताची ऊर्जा सुरक्षितता मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून आहे. झडण रिफायनरी देशांतर्गत मागणी भागवतात, तर खासगी रिफायनरी निर्यातीत आघाडीवर आहेत. कच्चे तेल खरेदीसाठी कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातून डॉलरमध्ये व्यवहार करतात. शुद्ध केलेले उत्पादने देशांतर्गत वापरली जातात व काही प्रमाणात निर्यात केली जातात.

भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करतो (२०२५ मध्ये सुमारे २३०-२४० दशलक्ष मेट्रिक टन). देशात एकूण २३ रिफायनरी आहेत-१९ सार्वजनिक क्षेत्रातील (PSU), ३ खासगी आणि १ संयुक्त उपक्रम. कच्चे तेल खरेदीसाठी तेल कंपन्या (IOC, BPCL, HPCL, Reliance, इ.) आंतरराष्ट्रीय पुरवठादारांना पैसे देतात. शुद्ध केलेले पेट्रोलियम उत्पादने देशांतर्गत वापरली जातात, काही प्रमाणात निर्यातही केली जाते.

**कच्चे तेल खरेदीचे वित्तपुरवठा -**

- तेल कंपन्या (IOC, BPCL, HPCL, Reliance, Nayara) आंतरराष्ट्रीय पुरवठादारांना थेट पैसे देतात.
- व्यवहार डॉलरमध्ये होतो; भारतीय रिझर्व्ह बँक व वाणिज्य बँका व्यवहार सुलभ करतात.
- सरकार थेट पैसे देत नाही, पण धोरणात्मक साठा व कर धोरणाद्वारे व्यवस्थापन करते.

**शुद्ध केलेल्या उत्पादनांचा वापर -**

- देशांतर्गत विक्री: पेट्रोल, डिझेल, ङ्खझ्र केरोसीन, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (ATF) इ.
- उद्योग व वाहतूक क्षेत्र: वीज निर्मिती, रसायन उद्योग, वाहतूक.
- निर्यात: Reliance व Nayara सारख्या खासगी रिफायनरी मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम उत्पादने परदेशात निर्यात करतात.
- सामाजिक वितरण: LPG व केरोसीन सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे (PDS) पुरवले जाते.

- रिलायन्स इंडस्ट्री अमेरिकेमध्ये ३०० बीलियन डॉलर इन्वेस्ट करून एक रिफायनरी सेटअप करत आहे. या रिफायनरीत तयार झालेले प्रोडक्टस् अमेरिका पुढील ३० वर्षासाठी विकत घेणार आहे असा खुलासा खुद्द प्रेसिडेंट ट्रम्प यांनी केला आहे.

**रिफायनरी क्षमता -**

| प्रकार | संख्या | क्षमता (MMTP) | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| PSU रिफायनरी | १९ | ~१५०+ | IOC, BPCL, HPCL, इ. |
| खासगी रिफायनरी | ३ | ~१०० | Reliance Jamnagar, Nayara Energy, इ. |
| संयुक्त उपक्रम (गत) | १ | ~६ | Bina Refinery (BPCL + Oman Oil) |
| एकूण क्षमता | २३ | ~२५६.८ | जगातील चौथ्या क्रमांकाची क्षमता |

**✻ नागरिक-प्रभाव सारणी**

| क्षेत्र | उत्पादन प्रकार | वापराचे स्वरूप | वाटा (%) |
|---|---|---|---|
| वाहतूक | पेट्रोल, डिझेल, TF | कार, ट्रक, विमान, रेल्वे | ४५-५०% |
| गृह वापर | LPG, केरोसीन | स्वयंपाक, प्रकाश, PDS | १५-२०% |
| उद्योग | नाफ्था, डिझेल, फर्नेस ऑईल | रसायन, वीज, प्रक्रिया उद्योग | १५-२०% |
| निर्यात | पेट्रोल, डिझेल, TF | परदेशी बाजारात विक्री | १०-१५% |
| सामाजिक वितरण | LPG, केरोसीन | गरीब व ग्रामीण भागासाठी | ५-१०% |

# अनिवासी भारतीयांना नोकरी व्यवसायाच्या अन्य देशांत संधी

आखाताची अर्थव्यवस्था युद्धामुळे धोक्यात आहे. ती सावरायला वेळा लागेल. असलेल्या कंपन्या व प्रोजेक्ट्स बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. तेथील सरकार पुन्हा देश उभा करण्यासाठी प्रचंड अर्थसहाय्य देऊ करतील व त्या वेळी तिथे नवीन प्रकारच्या संधी उपलब्ध होतील हे जरी खरे मानले तरी ज्यांच्या नोकऱ्या आता जातील, किंवा ज्यांना भारतातून नोकरी व्यवसायासाठी परदेशात यापुढे जायचे आहे, त्यांच्यासाठी हा लेख लिहिला आहे.

२०२६ मध्ये जगभरातील भारतीयांसाठी सर्वोत्तम नोकरीच्या संधी जर्मनीत उपलब्ध आहेत, कारण तेथे कुशल स्थलांतरितांसाठी सुधारित नियम, IT, अभियांत्रिकी आणि आरोग्य क्षेत्रातील कामगार कमतरता आणि सक्रिय व्हिसा प्रायोजन योजना आहेत. उच्च पगार (€७०,०००-€१००,००० सरासरी कुशल भूमिकांसाठी), कमी बेरोजगारी (३% च्या आसपास) आणि Make-it-in-Germany सारख्या सरकारी पोर्टल्समुळे ते कायमस्वरूपी निवासासाठी मजबूत पर्याय देतात. जर्मन भाषा येणे, जर्मन वर्क कल्चर समजवून घेणे हे जर्मनीत काम करण्यासाठी सगळ्यात महत्वाचे आहे.

**जर्मनी का अव्वल आहे -**

जर्मनीचा Skilled Immigration Act भारतीयांना शॉर्टेज क्षेत्रांमध्ये प्राधान्य देतो, ज्यात दरवर्षी ४ लाख+ रिक्त जागा IT (सॉफ्टवेअर डेव्हलपर्स €६०,०००-€९०,०००), अभियांत्रिकी (€७०,०००+) आणि नर्सिंग (€४५,०००-€६०,०००) मध्ये. अजून महत्वाचे म्हणजे make-it-in-germany.com सारखी अधिकृत पोर्टल्स प्रायोजित नोकऱ्या थेट सूचीबद्ध करतात; EU Blue Card किंवा Opportunity Card साठी प्रक्रिया वेगवान (४-८ आठवडे) साधारणतः आहे. जर्मनीमधील जीवन गुणवत्ता, मध्य युरोप स्थान आणि सध्या तिथे निवासी असलेल्या भारतीयांमुळे (२.५ लाख+) हा एक आकर्षक पर्याय असू शकतो. अर्थात अजून नकारात्मक बाबी आहेतच. पण त्याच उहापोह इथे करणे शक्य नाही, प्रत्येकाचा अनुभव वेगळा असू शकतो..

**स्थलांतरासाठी जवळचे स्पर्धक -**

कॅनडा Express Entry ने टेक/आरोग्य तज्ज्ञांसाठी (C-AD ८०,०००+ पगार) उच्च स्थानावर आहे, पण कॅप्स आणि लांब PR प्रतीक्षा यामुळे अनेकांना हा पर्याय नको वाटतो.

UAE जलद प्रवेशासाठी उत्कृष्ट (Green Visa, टॅक्स-मुक्त AED १५,०००+/महिना IT/बांधकामात), पण दीर्घकालीन नागरिकत्व नाही. युद्धामुळे संपूर्ण आखात आता जोखीमीचे क्षेत्र झाले आहे, त्यामुळे बरेच जण तिथे जाणे टाळतील असे दिसते.

USA टॉप पगार देते (USD १००,०००+ टेकमध्ये), पण H-1B लॉटरी मर्यादित प्रवेश. शिवाय ट्रम्पच्या अमेरिका प्रथम धोरणामुळे व इतर देशांतून अमेरिकेत स्थलांतरित होणारे यांची मोठी संख्या यामुळे अमेरिका देखील स्थलांतरासाठी अडथळ्यांची शर्यत ठरू शकते.

युरोपमध्ये २०२६ साठी विविध देशांमध्ये मागणी असलेल्या कौशल्यांची माहिती देशनिहाय खालीलप्रमाणे आहे. मुख्य क्षेत्रे IT, अभियांत्रिकी, आरोग्य, सायबरसुरक्षा यांचा समावेश असून पगार अनुभवानुसार बदलतात (वार्षिक ग्रॉस ए).

**जर्मनी -**

IT व्यवस्थापक, सॉफ्टवेअर आर्किटेक्ट्स, अभियांत्रिकी व्यवस्थापक, I/डेटा सायंटिस्ट, वैद्यकीय तज्ज्ञ यांची मोठी मागणी.
IT मॅनेजर: €९०,०००-€१६६,०००; अभियांत्रिकी: €७०,०००-€१००,०००; डॉक्टर्स: €११०,०००+.
शॉर्टेज क्षेत्रे: आरोग्य, IT, अभियांत्रिकी.

**फ्रान्स -**

टेक, आरोग्य, अभियांत्रिकी क्षेत्रात मागणी; सॉफ्टवेअर डेव्हलपर्स €५०,०००-€८०,०००.
औसत महिन्याला €३,५००+.

**नेदरलँड्स -**

सायबरसुरक्षा, IT, वित्त; मिड-लेव्हल सायबर: €६७,०००; हायली स्किल्ड मायग्रंटसाठी टेक.
औसत €३,८००-€४,२००/महिना.

**स्वीडन -**

R&D, उत्पादन, टेक; औसत €५०,०००-€९०,०००. उत्पादन/टेक क्षेत्रात उच्च मागणी.

**इटली -**

टेक, अभियांत्रिकी, आरोग्य; €५०,०००+ पगार.

**स्पेन -**

कृषी/सिझनल, टेक; €१,२००-€१,६००/महिना सिझनल. टेक: €४५,000.

**पोर्तुगाल -**

टेक, IT; सॉफ्टवेअर इंजिनीअर: €४५,000.

**आयर्लंड -**

टेक हब (गुगल, मेटा); मिड-लेव्हल डेव्हलपर: €६0,000; सिनियर €८0,000-€१00,000.

औसत €२,१00-€२,२00/महिना.

**मुख्य जॉब पोर्टल्स -**

- EURES.europa.eu: EU ची अधिकृत साइट, ३ दशलक्ष+ जॉब्स.
- rbeitnow.com/visa-sponsorship-jobs: जर्मनी/युरोपसाठी.
- Visasponsor.jobs: प्रायोजकांची यादी.

| देश | भारतीयांसाठी मुख्य ताकद | सरासरी कुशल पगार (वार्षिक) | तोटे |
|---|---|---|---|
| जर्मनी | व्हिसा सुधारणा, स्किल्स ची कमतरता, जॉब पोर्टल्स | €७0k-€१00k | भाषा (जर्मन उपयुक्त) |
| कॅनडा | झठ मार्ग, बहुसांस्कृतिक | CAD ८0€+ | प्रक्रिया विलंब |
| UAE | जलद व्हिसा, करमुक्त पगार | AED १५0€+ | नागरिकत्व नाही.<br>युद्ध परिस्थिती. |
| USA | उच्च पगार, टेक हब्स | USD १00€+ | व्हिसा लॉटरी.<br>अमेरिका प्रथम धोरण. |

| देश | मुख्य कौशल्ये | सरासरी वार्षिक पगार (E) |
|---|---|---|
| जर्मनी | IT, अभियांत्रिकी, डॉक्टर्स | ७0,000-१00,000 |
| नेदरलँड्स | सायबरसुरक्षा, खढ | ६७,000 (मिड) |
| आयर्लंड | सॉफ्टवेअर डेव्हलपर | ६0,000-१00,000 |
| स्पेन | कृषी, टेक | ४५,000 |






# इराणच्या हृदयात एका शीखाचा आत्मा

**- लेखकः सरदार परविंदरसिंग चंधोक**



इराणच्या पवित्र भूमीपासून ते जगभरातील लाखो स्क्रीनपर्यंत, सरदार परविंदर सिंह (लोकप्रिय नाव सरदार चांधोक) यांची मुलाखत सोशल मीडियावर वाइल्डफायर प्रमाणे पसरली आहे. जवळपास ८०,००० लोकांनी पाहिलेला हा संवाद केवळ मुलाखत नाही; तर तो आहे-धर्मनिष्ठा, राजनैतिक शहाणपण आणि भारतीय शीख समुदाय व इराणी जनतेतील अटूट बंध यांचा एक अद्वितीय धडा.

जगातील भू-राजकीय गोंगाटात, सरदार चांधोक यांचा आवाज खऱ्या भक्तीचा आहे-इराणमधील शीखांचा विशेष दर्जा स्पष्ट करणारा आणि जागतिक शांततेसाठी (सरबत दा भला) हृदयस्पर्शी आवाहन करणारा. धैर्य, परंपरा आणि 'नमक हलाली'चा संदेश जो जगभरात पसरतो आहे.

**संपूर्ण मुलाखतीचा सारांशः सरदार चांधोक यांचे इराणवरील विचार -**

**१. ओळख आणि परंपरा (चार पिढ्या) -**

त्यांनी स्पष्ट केले की त्यांचे कुटुंब इराणमध्ये चार पिढ्यांपासून राहते.

इराण ही शीखांसाठी पवित्र भूमी आहे-गुरु नानक देवजी येथे प्रवास करून गेले आणि भाई मर्दाना जी येथे खोर्रमशहरमध्ये समाधिस्त आहेत.

**२. निर्णायक प्रश्नः तुम्ही इराणसोबत आहात का?**

✻ **उत्तर शीख तत्त्वांवर आधारितः**

✻ **संत-सिपाही आणि नमक हलालीः** शीख हा संत-सिपाही आहे जो ज्या भूमीचे मीठ खातो त्या भूमीचे रक्षण करतो.

✻ **भूमीशी निष्ठाः** भारतातील शीख भारताशी निष्ठावान असतो, तसेच इराणातील शीख इराणी जनतेशी निष्ठावान असतो.

✻ **अन्यायाविरुद्ध भूमिकाः** शीख कोणत्याही राष्ट्राविरुद्ध भेदभाव करत नाही, पण अन्यायाविरुद्ध उभा राहणे हे धार्मिक कर्तव्य आहे.

**३. आध्यात्मिक आणि ऐतिहासिक बंध**

**त्यागाची भावनाः** शीखांचा चढदी कला भाव आणि इराणींची इमाम हुसेनप्रती भक्ती यांची तुलना.

**भाषिक नातेः** फारसी भाषा ७०० वर्षे पंजाबची दरबारी भाषा होती; गुरु गोबिंद सिंहजी यांनीही फारसीत रचना केल्या.

**४. सलाम सरदारः इराणमधील शीखांचा दर्जा -**

**दस्तारचा सन्मानः** शीखांना सलाम सरदार म्हणत विशेष आदर दिला जातो. सुरक्षा दल दस्तारला धार्मिक मुकुट मानून स्पर्श करत नाहीत.

**विशेष संरक्षणः** इराणी नेतृत्वाने शीख ओळख कायद्याने संरक्षित केली आहे.

**५. सत्य विरुद्ध प्रचार (दैनंदिन जीवन) -**

**वेशभूषा आणि शालीनताः** इराणी शालीनता कायदे पंजाबी संस्कृतीशी सुसंगत आहेत. सलवार-कमीज आणि चुन्नी आदराने स्वीकारले जातात.

**धैर्यः** संघर्षाच्या वातावरणातही इराणी जनता शांत आणि सन्मानाने उभी राहते.

**६. जागतिक आवाहन आणि सरबत दा भला -**

**संवादः** ते म्हणतात की शक्तीने प्रश्न सुटत नाहीत; संवादानेच शांतता येते.


**आवाहनः** त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना आवाहन केले की त्यांच्या आवाजाला दोन्ही बाजूंनी आदर आहे, त्यामुळे ते मध्यस्थी करावी.

**प्रार्थनाः** सर्वांनी सरबत दा भलासाठी प्रार्थना करावी-तिसऱ्या महायुद्धाला थांबवण्यासाठी.

हा संदेश केवळ इराणपुरता नाही, तर संपूर्ण जगासाठी आहे-अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करणे हेच खरे शीख धर्माचे तत्त्व आहे.

# अनिवासी भारतीयांचे एकाकीपणा, जीवनाचा उद्देश आणि निवृत्तीनंतरच्या जीवनावरील विचार...!

- लेखकः दिलीप केशव परांजपे



**असे प्रश्न ज्यांच्याबद्दल कोणी बोलत नाही -**

जेव्हा एखादा अनिवासी भारतीय अनेक दशकांनंतर भारतात परत येतो, विशेषतः निवृत्तीनंतर, तेव्हा त्याचे मनात असंख्य प्रश्न असतात. तरीही, आश्चर्याची गोष्ट म्हणजे, यापैकी बहुतेक प्रश्न अनुत्तरितच राहतात..., आणि त्यांच्याबद्दल बोललेही जात नाही. २०२० मध्ये, करोना काळात आंतरराष्ट्रीय विमानांची वाहतूक बंद होण्यापूर्वी, मी भारतात परत आलो तेव्हा मला याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

आखातातील बांधकाम उद्योगात चाळीस वर्षांहून अधिक काळ घालवल्यानंतर, मायदेशी (घरी) परतणे मानसीक दृष्टा गोंधळात टाकणारेच होते. या प्रदिर्घ कालावधीत कधीतरी, माझा शेजाऱ्यांशी आणि बालपणीच्या मित्रांशी संपर्क तुटला होता. माझ्या मते, अनिवासी भारतीयांमध्ये हे सामान्य आहे; आणि त्याच बरोबर, आपल्यापैकी बरेच जण आपल्या मूळ गावापासून दूर, ज्या ओळखीच्या रस्त्यांवर आपण लहानाचे मोठे झालो, त्यापासून दूर घरे विकत घेतात. याचा परिणाम म्हणजे एक अनपेक्षित एकाकीपणा..., स्वतःच घर असूनही, परकेपणाची भावना.

**नवीन जीवनाची तयारी -**

निवृत्ती जवळ येत असताना, भारतात परत आल्यावर माझे दिवस कसे असतील याचा मी खोलवर विचार करू लागलो. मी आणि माझी पत्नी अनेकदा बऱ्याच गप्पा मारायचो... तिची आवड, माझ्या आवडीनिवडी आणि आम्ही अशी दिनचर्या कशी तयार करू शकतो ज्यामुळे आम्ही दोघेही सक्रिय आणि आनंदी राहू.

माझ्या लक्षात आलेली एक गोष्ट म्हणजे, निवृत्त पुरुषांना वेळ घालवण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागतो. अनेकांना अचानक दिशाहीन झाल्यासारखे वाटते. आपल्या सभोवताली संधी असूनही, नवीन भूमिका स्वीकारण्यास संकोच वाटतो. मी लाखांमध्ये कमावले आहे; आता काही हजार रुपयांसाठी काम का करावे? अशा विचारांमुळे आपण मागे राहतो.

पण मी शिकलो की निवृत्तीनंतरच्या कामांचा संबंध पैशांशी नाही. तो सक्रिय राहणे, संबंधित राहणे आणि मानसिकदृष्ट्या आनंदाने राहण्याशी आहे.

**अनुभवातून जीवनाचा उद्देश शोधणे -**

बांधकाम उद्योगातील माझ्या अनेक दशकांच्या अनुभवाने मला सखोल टेक्निकल ज्ञान दिले होते. लेखनाच्या आवडीने मला एक टेक्निकल रायटर बनवले होते. या दोन्ही गोष्टींनी मला एक टेक्निकल ट्रेनर म्हणून घडवले. जेव्हा जेव्हा संधी मिळते, तेव्हा मी 'स्किल इंडिया' मोहिमेला पाठिंबा देणाऱ्या संस्थांना आणि विद्यार्थ्यांना माझे कमावलेले ज्ञान देण्याचा प्रयत्न करतो. अनुभवावरून माझ्या लक्षात आले आहे की, शिकवणे हे केवळ एक योगदान नाही..., तर समाजाशी जोडलेले राहण्याचा तो एक मार्ग आहे. त्याच वेळी, माझ्या सर्जनशील लेखनाला एक अनपेक्षित वळण मिळाले. त्यामुळे चित्रपट कथाकथनाचे दरवाजे उघडले..., चित्रपट, ओटीटी मालिका आणि लघुपटांसाठी पटकथा, संवाद, स्क्रीनप्ले लिहीण्याची संधी मिळाली. मी अखेरीस एका चित्रपट कंपनीत सामील झालो, आणि स्वतःच्या अशा एका पैलूचा पुनर्शोध घेतला ज्याकडे मी अनेक वर्षे दुर्लक्ष केले होते. माझ्यासाठी, हे कधीही पैसे कमावण्याबद्दल नव्हते; तर माझा वेळ अर्थपूर्ण आणि समाधानकारक मार्गाने घालवण्याबद्दल होता.

**परत येणाऱ्या प्रत्येक अनिवासी भारतीयासाठी एक संदेशः**

जर तुम्ही दशकांनंतर भारतात परत येत असाल किंवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असाल, तर माझा हा एक नम्र सल्ला आहे:

तुमच्या अंतर्मनाचा आवाज ऐका. तुमची खूप काळापासून दुर्लक्षित असलेली आवड शोधा.

त्यातून आर्थिक फायदा होतो की नाही, हा दुय्यम प्रश्न आहे. महत्त्वाचे हे आहे की त्यामुळे तुमचे मन सक्रिय राहते आणि मन समाधानी होते.

दररोज चौदा तास रिकामपणात वाया घालवण्याऐवजी, तुमचा वेळ काहीतरी सर्जनशील, विधायक आणि आनंददायक कामात घालवा. तुम्ही दूर असताना जग बदलले असेल, पण तुमच्या अनुभवासाठी, तुम्ही मिळवलेल्या माहितीसाठी आणि तुमच्या योगदानासाठी नेहमीच जागा असते.

# भारतात परत का आलो ?

कॅनडामध्ये दहा वर्षे घालवल्यानंतर एका एनआरआय महिलेने इंस्टाग्रामवर परत भारतात कुटुंबासह का आली याबद्दल सांगितले. तिच्या फॉलोअर्सकडून आलेल्या उत्सुकतेला आणि प्रश्नांच्या लाटेला उत्तर देण्यासाठी तिने हा निर्णय शेअर केला.

स्नेहा खिलवाणी नावाच्या महिलेने एका रीलमध्ये आपला निर्णय नोंदवला आणि सांगितले की तिला आणि तिच्या नवऱ्याला अनेकांनी विचारले की हा निर्णय व्हिसा समस्येमुळे किंवा करिअर अपयशामुळे घेतला का. आम्ही कॅनडामध्ये अपयशी ठरलो नाही, स्नेहा म्हणाली, आणि दोघेही प्रत्यक्षात कॅनेडियन नागरिक असल्याचे स्पष्ट केले.

'भारत परतणे हा अचानक घेतलेला निर्णय नव्हता' परदेशातील १० वर्षांचा काळ आठवत स्नेहाने तो काळ खूप, खूप चांगला असल्याचे वर्णन केले. तिने सांगितले की कॅनडाने तिच्या कुटुंबाला स्थैर्य दिले, पण भारतात परतणे हा कधीही अचानक घेतलेला निर्णय नव्हता, तर दीर्घकालीन योजनेचा भाग होता.

स्नेहाने अधोरेखित केले की यश केवळ स्वच्छ रस्ते, चांगले पगार किंवा शांत हिवाळे यावर मोजले जात नाही. यश म्हणजे कुटुंब आणि संस्कृतीच्या जवळ असणे देखील असू शकते. जिथे तुमचे मन घरासारखे वाटते, तेवढेच महत्त्वाचे आहे, ती म्हणाली. परदेशात हा आपलेपणाचा भाव पूर्णपणे अनुभवता येत नाही, असे तिने सांगितले.

'इथे आमच्या मुलांना आजी-आजोबा आहेत' स्नेहाने सांगितले की तिचे कुटुंब कॅनडाला मिस करेल-तेथील मैत्रीपूर्ण लोक, स्वच्छ हवा, हिरवाई आणि शांत दिवस-पण भारतातील अनोख्या आनंदाबद्दल ते तितकेच उत्साहित आहेत.

इथे आमच्या मुलांना आजी-आजोबा आहेत. आपण सगळे मिळून सण साजरे करू शकतो, अचानक होणाऱ्या कौटुंबिक भेटींचा आनंद घेऊ शकतो आणि अशा आठवणी तयार करू शकतो ज्या फक्त स्क्रीनवर घडत नाहीत, ती म्हणाली. गेल्या १० वर्षांत कुटुंबापासून दूर राहिल्यामुळे लग्न, आजारपण आणि अनेक क्षण चुकले, जे पुन्हा मिळवता येणार नाहीत, असे तिने नमूद केले.

तिने स्पष्ट केले की परतण्याचा निर्णय त्यांच्या जीवनाच्या टप्प्याशीही संबंधित होता. मुलं अजून लहान असल्यामुळे त्यांना वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेणे सोपे होईल. हा निर्णय देशांची तुलना करण्याबद्दल नसून, त्यांच्या प्रवासाच्या या टप्प्यावर योग्य वाटणारे जीवन निवडण्याबद्दल आहे, असे त्यांनी सांगितले.

नेटिझन्सची मिश्र प्रतिक्रिया काहींनी स्नेहाच्या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयाचे कौतुक केले, तर काहींनी विचारले की जोडप्याने कॅनेडियन नागरिकत्व का कायम ठेवले.

एका वापरकर्त्याने लिहिले, लोक परत येतात तेव्हा त्यांचे जीवन अनिश्चित नसते. तुम्ही परत आलात कारण तुम्हाला सुरक्षितता होती. तुम्हाला माहित होते की कधीही हवे तर तुम्ही पुन्हा कॅनडाला जाऊ शकता.

तर दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, स्पष्ट करूया: जे लोक कॅनडातून भारतात परत येतात ते 'जमले नाही' म्हणून परत येत नाहीत. त्यांच्याकडे मजबूत करिअर, पैसा, स्थैर्य-सगळं असतं. खरं तर खरी ताकद हीच आहे: ते इतके सुरक्षित होते की त्यांना कुणाला काही सिद्ध करण्याची गरजच नव्हती.



## २३ वर्षीय महिला वैमानिक आणि युद्धासारखी परिस्थिती. पण तिचं धैर्य मात्र अजिबात डगमगलं नाही!

हरियाणातील फरीदाबादची २३ वर्षीय वैमानिक दीपिका अधाना हिने धैर्य आणि जबाबदारीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिलं. एका विशेष Rescue Flight च्या माध्यमातून तिने UA-E मधून १६९ भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे भारतात परत आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या मोहिमेची माहिती मिळाली तेव्हा परिस्थिती अत्यंत संवेदनशील होती. तरीही दीपिकाने क्षणभरही न डगमगता ही जबाबदारी स्वीकारली. कुटुंबाशी बोलताना ती भावनिक शब्दांत म्हणाली, आई, काका शेवटचं मला पाहून घ्या, कदाचित पुन्हा दिसणार नाही. मात्र कुटुंबीयांनी भीती व्यक्त करण्याऐवजी तिला धैर्य दिलं आणि तिच्या निर्णयाला पाठिंबा दिला. या मोहिमेची आणखी एक खास बाब म्हणजे: संपूर्ण विमानाचा क्रू महिलांचा होता. कॅप्टनपासून ते क्रू सदस्यांपर्यंत सर्व सहा सदस्य महिला होत्या.

# यु एस - इस्त्राएल - इराण युद्धाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम

**- लेखक: राजन तावडे**



भारतातील गॅस पुरवठा वितरणावर एव्हच लागू केल्याने विपरीत परिणाम झाला आहे. ३०% ते ५०% हॉटेल्स बंद झाले आहेत. खानावळी बंद झाल्या आहेत. गॅस वर आधारित सर्व उद्योग प्रभावित झाले आहेत, बहुतेकांनी उद्योग बंद केले आहेत. डिझेल पेट्रोल सध्या मिळते आहे, किमतीत वाढ झाली आहे. अजून किती दिवस डिझेल पेट्रोल मिळेल माहित नाही. त्यामुळे रस्त्यावरची वाहतूक कमी होईल. अगोदरच लांब पल्ल्याच्या ट्रक वाहतुकीवर परिणाम झाला आहे, त्यामुळे माळ वाहतूक कमी झाली आहे, काही ठिकाणी थांबली आहे. स्टॉक मार्केट कोसळले आहे. गुंतवणूकदारांचे काही लाख कोटींचे नुकसान झाले आहे. शेतमाल गोदीत पडून आहे, जे प्रवासात होत ते अडकून पडले आहेत, तो माल जर खराब झाला तर फेकून द्यावा लागेल. इन्शुरन्स चा प्रीमियम वाढला आहे. ऊर्जा, इंधन, ऑइल च्या प्रॉडक्ट्स वर अवलंबून असणारी सर्व व्यवस्था कोसळली आहे.

एकंदरीत सर्व वाटचाल कोरोनापेक्षा वाईट अवस्थेकडे चालू आहे. अनेक शहरातील शिक्षणासाठी आलेली मुले मुली मेस बंद झाल्याने शहरात राहू शकणार नाही. त्यांना गावी जाण्याचा पर्याय असेल तर त्यांना जावे लागेल. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसला आहे.

उद्योग धंदे बंद झाल्याने मजूर व कामगार यांना आर्थिक उत्पन्न बंद झाले आहे. बाजारात फिरणारा पैसा थांबला आहे. हि स्थिती एकदा बिघडली तर पुन्हा पूर्वपदावर येण्यास काही महिने कदाचित वर्षाचा वेळ लागू शकेल.

चलनवाढी चा दर प्रचंड वाढत आहे. आरबीआय ला घसरणारा रुपया सावरायला संधी मिळेल असे वाटत नाही. ट्रेड डेफिसिट, ऑइल डेफिसिट, फिसकल डेफिसिट सर्व वाढणार आहे, वाढत आहे.

या सर्वात आपल्या अर्थमंत्री आणि आपले पंतप्रधान कुठेच दिसत नाही, त्यांच्या तर्फे कुठली ठोस उपाययोजना पुढे येत नाही. त्यांना कदाचित परिस्थितीचे योग्य आकलन झालेले दिसत नाही, किंवा त्याची असा उपाय सुचविण्याची क्षमता नाही.

| **क्षेत्र/बाब** | **प्राथमिक परिणाम** | **प्रमाण/तपशील** |
|---|---|---|
| तेल आयात | कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने आयात बिल वाढले | ब्रेंट ११८-१२०/बॅरलने ६५% वाढ; भारताचे ८५% तेल आयातित, ६०% होर्मुझ मार्गाने |
| महागाई | इंधन, वाहतूक आणि खर्च वाढल्याने ग्राहकांवर परिणाम | १०/बॅरल वाढीने ०.४% महागाई; किराणा, मालवाहतूक, विमानप्रवास प्रभावित |
| चलन (रुपया) | आयात खर्च आणि जोखीम टाळल्याने अवमूल्यन | १०/बॅरल वाढीने चालू खाते तूट ४०-५० ; बीपीएस वाढ बाह्य कर्ज ताण |
| शेअर बाजार | ऊर्जा-संवेदनशील क्षेत्रांमध्ये चढ-उतार आणि घसरण | सेन्सेक्स १.७२% खाली; विमान, ऑटो, एफएमसीजी, लॉजिस्टिक्स प्रभावित |
| व्यापार व निर्यात | शिपिंग व्यत्यय, फ्रेट/विमा खर्च वाढ; खाडी बाजारपेठा जोखमीत | ११.८ अब्ज अन्नधान्य निर्यात धोक्यात; एसएमई परफ्यूम शिपमेंट्स विलंब |
| जीडीपी वाढ | ऊर्जा धक्क्यातून गतिविधी मंदावली | १०% तेल वाढीने २०-२५ बीपीएस घट; आर्थिक वर्ष २०२७ वाढ जोखमीत |
| चलनप्रेषण | खाडीतील भारतीयांच्या अस्थिरतेमुळे प्रवाह कमी | घरगुती उत्पन्न आणि खपावर परिणाम |
| उद्योग (उदा. खते, स्टील) | एलएनजी/गॅस किमती वाढल्याने उत्पादन खर्च वाढ | एलएनजी ५०% वाढ; अन्नसुरक्षा, उत्पादन प्रभावित |

# दुबईत अडकलेल्या भारतीयांसाठी मालेगावचा सुपुत्र ठरला 'देवदूत'!

मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे अनेक भारतीय दुबई आणि यूएईमध्ये अडकून पडले. उड्डाणे रद्द झाल्यामुळे अनेक प्रवाशांकडे राहण्याची योग्य व्यवस्था नव्हती. अशा कठीण वेळी मालेगावचे उद्योजक धीरज जैन यांनी दाखवलेली माणुसकी सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

धीरज जैन यांनी अजमान (UAE) येथे असलेल्या आपल्या आलिशान फार्महाऊसचे दरवाजे अडकलेल्या भारतीयांसाठी पूर्णपणे खुले केले. येथे प्रवाशांना मोफत निवास, जेवण, चहा-नाश्ता आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. संकटाच्या काळात अनेक भारतीयांसाठी हे फार्महाऊस अक्षरशः सुरक्षित आश्रयस्थान ठरले.

**फार्महाऊस बनले तात्पुरते आश्रयस्थान -**

अडकलेल्या लोकांची अडचण लक्षात घेऊन फार्म हाऊसमध्ये मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली.

- ११ बेडरूम आणि मोठे हॉल राहण्यासाठी खुले केले
- ५०० गाद्या आणि ७०० ब्लँकेट्स उपलब्ध करून दिले
- हजारो लोकांसाठी मोफत अन्न आणि नाश्त्याची व्यवस्था

यामुळे अनेक भारतीयांना परदेशात असतानाही घरासारखे वातावरण मिळाले.

**गाड्यांचीही व्यवस्था -**

फक्त राहण्याचीच नाही तर विमानतळ किंवा हॉटेलमध्ये अडकलेल्या प्रवाशांना फार्महाऊसपर्यंत आणण्यासाठी ११ लक्झरी गाड्यांची व्यवस्था करण्यात आली. काही प्रवाशांना तर Rolls Royce गाड्यांमधूनही आणण्यात आले.

**माणुसकीचा जिवंत आदर्श -**

संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करून धीरज जैन यांनी भारतीय संस्कृतीतील अतिथी देवो भव ही भावना जगासमोर जिवंत ठेवली आहे. सोशल मीडियावरही त्यांच्या या कृतीचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

मालेगावच्या या सुपुत्राने दाखवून दिले की
संकटात माणुसकीच सर्वात मोठी ताकद असते.

**धीरज जैन यांच्या या कार्याला सलाम!**





Embassy of India
Abu Dhabi
****

ADVISORY

In view of the current regional situation, all Indian nationals in the United Arab Emirates are advised to avoid unnecessary travel, take due care, remain vigilant, follow safety guidelines and advisories as and when issued by the UAE authorities and the Embassy.

2. The Embassy of India, Abu Dhabi and the Consulate General in Dubai are continuing to function normally and will issue updates as necessary.

3. For any emergency query, the Indian nationals in the UAE can contact the following numbers:

Toll free number: 800-46342

WhatsApp : +971543090571

Email : pbsk.dubai@mea.gov.in and ca.abudhabi@mea.gov.in

****

Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261



INCUBATE PARTNERS

MENTORING * INCUBATION * GROWTH
SUSTAINABILITY * FUNDING

# WHY INVESTORS NEED OUR ADVISORY OR MENTORING SUPPORT?

We respect the intelligence and business acumen of our clients. But, we know, they also face some issues, sometimes, many times. They are just not vocal about it.

**Angel Investors:** They face three issues mainly. (1) Visibility on deal pipeline and doing due diligence on deal pipeline (2) Taking right investment decision at right valuation at right time. And of course implementing the decision correctly. (3) Post investment management through Board Meetings or Dash Board or else.

All angel investors do not have these skills. Sometimes they don't even know where they want to invest. The list is long. But, we help them in this process. As one team.

**Business Investors:** Businesses go through various challenges. From Concept to Turnaround. Generating traction, maintaining stakeholders relationship, meeting the targets, failing and rising again, legal disputes, botched operations, piling inventory, chocked debtors, demanding creditors, difficult employees, attrition, training workforce, managing overheads, compliances, managing capital budgets, revenue growth, competition, strategic management, succession. Long List.

The CEO at the top feels the pressure. And mostly alone. We stand by the CEO or the Chairman or the owner. With only one intention. To help and to mentor. We do it quietly, professionally and with absolute commitment. CEOs and Owners shall not hesitate to take such mentoring or counseling support, however experienced or well-staffed you may be.

**VCs and other Funds:** Well, as we observe their challenge is exit. Honorable and smooth exit. Not to talk about this, because, those who understand, need no further explanation. We do help you in restructuring your portfolio too, besides above.

We also represent your interests, on your behalf on the Board of Directors, if you wish.






**Contact Us**

**Dr Sandeep Kadwe** Mentor and Managing Partner, Incubate Partners, Pune

Mobile: +91 834 933 1708 Email: mentor@in3bet.com Website: www.in3bet.com